# नि वि दा सू च ना

जिल्हाधिकारी रायगड यांचे नियंत्रणाखालील निर्लेखित करण्यात आलेल्या डि.व्ही. वाहनाची खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे हातच्या किंमतीपेक्षा जास्त किंमत देऊन खरेदी करु इच्छिणाऱ्या लोकांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | हातची किंमत |
|---|---|---|---|
| १ | ॲम्बीसिडर कार | एमएच-०६-एम-९९६५ | १२०००/- |

सदर वाहन हे पोलीस मुख्यालयाच्या आवारांत पाहण्यासाठी उपलब्ध करुन ठेवण्यात आले आहे. सदरचे वाहन कार्यालयीन वेळेत इच्छुक लोकांना पाहता येतील. ज्या कोण इच्छुक व्यक्तीस सदरहू कार खरेदी करण्याची असेल, त्यांनी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांच्या नावाने मोहोरबंद किंमतीच्या निविदा दि. ०६/०९/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग (सामान्य प्रशासन शाखा) या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने सादर कराव्यात दि. ०६/०९/२०१९ रोजी दुपारी २.०० वा. नंतर आलेल्या निविदा, टपालाने उशिरा प्राप्त झालेल्या निविदा किंवा अपूर्ण असलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. वाहन खरेदी निविदा भरणेसाठी अनामत रक्कम म्हणून रु. ५,०००/- (र.रु. पाच हजार मात्र) एवढी रक्कम जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे निविदेसोबत धनाकर्षाने भरावी लागेल.

लखोटा मोहोरबंद असावा. त्यावर **"वाहन क्रमांक-------" साठी** असे ठळक अक्षरांत लिहीलेले असावे. अनामत रक्कमेच्या धनाकर्षाशिवाय आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. प्राप्त निविदा त्याच दिवशी म्हणजे दि. ०६/०९/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात उघडण्यात येतील.

निविदा स्विकारल्याचे निविदा धारकास कळविल्यानंतर अनामत रक्कम वगळून उर्वरित रक्कम २ दिवासांत पूर्ण भरुन त्यानंतर ३ दिवसांत वाहन घेऊन जावे लागेल. तसे न केल्यास भरलेली रक्कम शासनाकडे जमा होईल व परत दिली जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार/विनंती मान्य केली जाणार नाही.

ज्यांचे नांवे निविदा मंजूर करण्यात आलेली असेल, त्यांनी संपूर्ण रक्कम जमा करुन वाहन न नेल्यास पुन्हा निविदा मागवून गाडीची विल्हेवाट लावण्यात येईल. त्यावेळी निविदा धारकाची कोणतीही तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही. तसेच कमी किंमत आल्यास संबंधित व्यक्तीकडून नुकसानीची रक्कम जमीन महसूलाचे थकबाकीप्रमाणे वसूल करण्यांत येईल.

कोणतेही कारण न दाखविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. याबाबतीत कोणतीही तक्रार करता येणार नाही.

**क्रमांक साशा/कार्या-१/वाहन निविदा/२०१९**
**जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड**
**अलिबाग, दि.   /०८/२०१९**

(रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)
रायगड-अलिबाग

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग Collector Raigad-Alibag

स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी रायगड यांची सही असे.